# महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951
# पोलीसांचे कार्यकारी अधिकार व कर्तव्य

गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय,

नाशिक

# पोलीसांचे कार्यकारी अधिकार व कर्तव्य

- कलम 64 :- खालील कामे करणे हे प्रत्येक पोलीसांचे कर्तव्य
- क) समन्स, अधिपत्र किंवा इतर आदेश यांचे तत्परतेने पालन व अंमलबजावणी करणे. वरीष्ठ अधिकाऱ्यांचे कायदेशिर समादेश अमलात आणणे.
- ख) आपल्या संपुर्ण क्षमतेचा वापर करुन, दखलपात्र अपराधांच्या कृत्यासंबधतात किंवा असे अपराध करण्याच्या कारस्थानांच्या संबधी गुप्त माहिती मिळविणे आणि अपराध्यांना न्यायासनासमोर आणण्यासाठी किंवा दखलपात्र अपराध व आपल्या दृष्टिपथात बिनदखली अपराध केला जाण्यास प्रतिबंध करण्यासाठी योग्य असेल अशी कायद्याशी आणि आपल्या वरिष्ठाच्या आदेशांशी सुसंगत असणारी माहिती देणे व अशी इतर उपायोजना करणे

ग) आपल्या संपर्णु क्षमतेचा वापर करुन, सार्वजनिक उपद्रव निर्माण होण्यास आळा प्रतिबंध करणे

घ) ज्या व्यक्तींना पकडण्यासाठी त्यास कायदेशीररीत्या प्राधिकार देण्यात आलेला असेल आणि ज्यांना पकडण्यास पुरेसे कारण असेल अशा सर्व व्यक्तींना गैरवाजवी विलंब न लावता पकडणे.

ङ) अन्य पोलीस अधिकारी बोलावील तेव्हा, किंवा त्याचे काम करतेवळी मदतीची गरज लागेल तेव्हा त्यास, ज्यास मदत करावयाची त्या अधिकाऱ्याच्या बाबतीत कायदेशीर व वाजवी असेल अशा रीतीने मदत करणे

च) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार त्यांच्याकडे सोपविण्यात आलेली असतील अशी कर्तव्य पार पाडणे

## कलम 65 :-

1) राज्य शासनाने किंवा कायदेशीररीत्या प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने केलेले नियम आणि आदेश यांना अधीन राहुन प्रत्येक पोलीस अधिकाऱ्यास ज्या कोणत्याही सार्वजनिक जागेचा, दारुचा गुत्ता किंवा मादक द्रव्याच्या विक्रीसाठी दुकान किंवा स्वैर व बेशिस्त वर्तणुकीच्या लोकांची ये-जा असलेली जागा म्हणुन वापर होत असतो. असे त्यास सकारण वाटत असेल त्या जागेत कलम 64 मध्ये निर्देश केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी अधिपत्राशिवाय प्रवेश करता येईल व तिची तपासणी करता येईल

## कलम 65 :-

2) जेव्हा रस्त्यात किंवा सार्वजनिक जागेच्या ठिकाणी पोलीस अधिकाऱ्यास चोरीची मालमत्ता असल्याचा खरोखर संशय वाटत असेल अशी कोणतीही वस्तु एखाद्या व्यक्तीच्या ताब्यात असेल किंवा ताब्यात असल्यचे दिसुन येत असेल तेव्हा, त्या पोलीस अधिका-यास तीसाठी झडती घेता येईल आणि तिची तपासणी करता येईल व ती बद्दल स्पष्टीकरण मागता येईल आणि ( ती मालमत्ता) ताब्यात असलेल्या व्यक्तीने दिलेले स्पष्टीकरण उघडपणे खोटे किंवा संशयास्पद असेल तर ती वस्तु अटकावुन ठेवता येईल आणि ती हकीकत दंडाधिकऱ्यास कळविता येईल आणि त्यानंतर दंडाधिकारी / फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 ची कलमे 452 आणि 455 अनुसार किंवा त्या वेळी अमलात असलेल्या इतर कायद्यानुसार कार्यवही करील.

कलम 66 :- खालील कामे करणे हे प्रत्येक पोलीसांचे कर्तव्य

क) रस्त्यावरील अपंग असहाय्य व्यक्तींना आपल्या अधिकारात असेल असे सर्व प्रकारचे सहाय्य करणे आणि ज्या धोकादायक किंवा स्वतःस सांभळण्यास असमर्थ वाटत असतील अशा नशा चढलेल्सा व्यक्तींना आणि इतस्ततः फिरणाऱ्या वेडया लोकांना ताब्यात घेणे

ख) अटक केलेली किंवा अभिरक्षेत ठेवलेली कोणतीही व्यक्ती जखमी किंवा आजारी असल्यास तिच्यासाठी आवश्यक असेल ती मदत मिळविण्याची तात्काळ उपाययोजना करणे आणि अशा व्यक्तीवर पहारा करतांना किंवा तिला बरोबर घेवुन जातांना तिच्या अवस्थेकडे योग्य लक्ष पुरविणे

कलम 66 :- खालील कामे करणे हे प्रत्येक पोलीसांचे कर्तव्य

ग) अटक केलेल्या किंवा अभिरक्षेत ठेवलेल्या प्रत्येक व्यक्तीला योग्य अन्न व निवारा देण्याची व्यवस्था करणे

घ) झडत्या घेताना निष्कारण उध्दटपणा न करणे व विनाकाराण त्रास न देणे

ड) स्त्रिया व मुले यांच्याशी वागताना सभ्यतेचे काटेकोरपणे पालन करुन वाजवी सौम्यपणाने वागणे

च) आगीमुळे हानी किंवा नुकसान होउ न देण्यासाठी आपल्या प्रयत्नांची शिकस्त करणे.

कलम 67 :- खालील कामे करणे हे प्रत्येक पोलीसांचे कर्तव्य

क) रस्त्यांवरील रहदारीचे नियमन व नियंत्रण करणे, रस्त्यात अडथळे येवु न देणे आणि त्यास आपल्या संपुर्ण क्षमतेचा वापर कय्ुन लोकांकडुन रस्त्यात किंवा रस्त्यांजवळ पालन केले जाण्यासाठी या अधिनियमान्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये केलेला कोणताही नियम किंवा आदेश याच्या उल्लंघनास प्रतिबंध करणे.

ख) रस्त्यात आणि स्नानाची, धुण्याची व उतरण्याची सार्वजनिक ठिकाणे, जत्रा, देवळे आणि सार्वजनिक जागेची इतर सर्व ठिकाण येथे व यामध्ये आणि सार्वजनिक उपासना स्थानांच्या आसपास सार्वजनिक उपासनेच्या वेळी सुव्यवस्था राखणे

कलम 67 :- खालील कामे करणे हे प्रत्येक पोलीसांचे कर्तव्य

ग) स्नानाच्या, धुण्याच्या आणि उतरण्याच्या सार्वजनिक जागी लोकांच्या येण्याजाण्याचे नियमन करणे त्या जागी आणि सार्वजनिक तरींवर फार गर्दी होउ न देणे आणि आपल्य संपुर्ण क्षमतेचा वापर करुन अशा कोणत्याही जागी किंवा तरींवर लोकांकडुन पालन केले जाण्यासाठी कायदेशीर रित्या केलेला कोणताही नियम किंवा आदेश यांच्या उल्लंघनास प्रतिबंध करणे.

**कलम 70 :-**

कोणत्याही प्राधिकाऱ्याने कलम 43, 55, 56, 57, 57-क किंवा 63-क या अन्वये केलेला प्रत्येक विनीयम आणि निदेश यांचे योग्यरीतीने पालन होत आहे हे पाहणे, अज्ञानामुळे त्याचे पालन करीत नसतील अशा व्यक्तीला ताकीद देणे आणि जाणुनबुजुन याचे पालन करीत नसेल अशा कोणत्याही व्यक्तीस अटक करणे हे पोलिसांचे कर्तव्य असेल.

## कलम 79 :-

कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास कलम 39 किंवा 40 अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केल्याच्या बाबतीत त्याच्या समक्ष कलम 117 किंवा कलम 125 किंवा कलम 130 किंवा 131 चा उ परखंड (एक) (चार) किंवा (पाच) किंवा कलम 135 च्या खंड (एक) अन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणताही अपराध करीत असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, दंडाधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय व अधिपत्राशिवाय अटक करता यईल.

**कलम 81 :-**

पोलीस अधिकारी, जी कोणतीही व्यक्ती, त्याच्या समक्ष कोणत्याही रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी या अधिनियमान्वये किंवा त्या अन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमान्वये शिक्षा पात्र असेल अस आणि ज्याबद्दल इतरत्र किंवा त्यावेळी अंमलात असलेया कोणत्याही इतर कायद्यान्वये कोणतीही स्पष्ट तरतुद केली नसेल असा बिनदखली अपराध करीत असेल व अशी व्यक्ती जर (एक) पोलीस अधिकाऱ्याकडुन ताकीद मिळाल्यानंतर असा अपराध करण्याचे चालु ठेवील. किंवा (दोन) पोलीस अधिकाऱ्याने आपल्याबरोबर पोलीस ठाण्यावर येण्यास सांगीतले असता त्याच्या बरोबर तेथे जाण्याचे, नाकारील, तर तिला अधिपत्राशिवाय अटक करु शकेल.

कलम 82 (1) :- पोलीस

क) त्यांना साडलेल्या किंवा त्यांच्या स्वाधीन केलेल्या, दावा न सांगीतलेल्या सर्व मालमत्तेचा व त्याचप्रमाणे

ख) जी कोणतीही मालमत्ता सार्वजनिक रस्त्यावर असल्याचे आढळुन येईल ती मालमत्ता काढुन नेण्याविषयी तिच्या मालकास किंवा ती स्वाधीन असलेल्या व्यक्तीस निदेश देण्यात आला असताही ती, मालमत्ता काढुन नेण्याचे नाकारील किंवा तसे करण्याचे टाळील तर त्या सर्व मालमत्तेचा तात्पुरता ताबा घेतील.

2) ज्या क्षेत्रासाठी आयुक्ताची नेमणुक करण्यात आली आहे अशा कोणत्याही क्षेत्रातट ज्या मालमत्तेचा पोलिसांनी पोट-कलम (1) अन्वये ताबा घेतला असेल ती मालमत्ता आयुक्ताच्या स्वाधीन करण्यात येईल.

कलम 145 :-

1) जी कोणतीही व्यक्ती पोलीस अधिकारी म्हणुन नोकरी मिळविण्याच्या किंवा नोकरीतुन मुक्त होण्याच्या कारणाकरिता खोटे निवेदन करीत किंवा खोटया दस्तऐवजांचा उपयोग करीत तिला, किंवा

2) जो कोणताही पोलीस अधिकारी

क) भित्रेपणाबद्दल दोषी असेल किंवा

ख) कलम 29 चे उल्लंघन करुन आपल्या पदाचा राजीनामा देईल किंवा आपली कर्तव्य बजावण्याचे सोडुन देईल किंवा

ग) कायद्याच्या किंवा कोणत्याही नियमाच्या किंवा आदेशाच्या ज्या तरतुदीचा जाणुनबुजुन भंग केल्याबद्दल किंवा त्यात हयगय केल्याबद्दल दोषी असेल किंवा

कलम 145 :-

घ) जो कर्तव्यपालन न केल्याबद्दल त्यावेळी आमलात असलेल्या कोणझ्त्याही इतर कायद्यान्वये कोणत्याही शिक्षेची तरतुद करण्यात आलेली नसेल असे कर्तव्य न केल्याबद्दल दोषी असेल त्याला, अपराधसिध्दीनंतर, तीन महिन्यापर्यंत वाढविता येवु शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा शंभर रुपयापर्यंत वाढविता येउ शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

कलम 145 :-

3) रजेवर गेलेला जो कोणताही पोलीस अधिकारी, अशा रजा संपल्यावर वाजवी कारणाशिवाय कामावर स्वतः हजर होण्यात कसुर करतील, तर त्याने पोट-कलम (2) खंड (ख) च्या कारणासाठी कलम 29 च्या अर्थानुसार आपल्या पदाची कर्तव्य बजावण्याचे सोडुन दिले आहे असे मानण्यात येईल.

# धन्यवाद